# एक दिवस 'राजा' बनलो! आता लाळ घोटूया!

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडे**

४० टक्के मतदार
मतदानही करीत नाहीत
मतदान केलेच तर
पुढची पाच वर्षे एकही
प्रश्न विचारत नाहीत
तरी आमदार, खासदार समोर
दिसला की बावचळून का जाता?
आपले भले केले नाही
तरी हात का जोडता?
कुणी चौकशीही करीत नाही
तरी त्यांचा जयजयकार
का करता?
हातात झेंडे, मनगटात घड्याळ
आणि इतके बंधने
का बांधून घेता?
आपण आपला प्रतिनिधी
निवडून देतो, जो मतासाठी
४५ दिवस हात जोडून
आपल्यापुढे उभा असतो
पण मतदान झाल्यावर
तोच हात सोडेल म्हणून
आपण इतके का घाबरतो?
सत्तेच्या खुर्चीवर आपणच
ज्याला बसवतो त्याच्यासमोर
शब्द उच्चारायला आपण
इतके का कचरतो?
अभिनेते असो नाहीतर नेते
त्यांना इतका भाव का द्यायचा?
आपल्या कमरेचे सोडून देऊन
त्याच्या मस्तकी फेटा का
बांधायचा?
पाच वर्षे ते आपल्याला
विसरले म्हणून आपला
संताप होतो
पण आपणच त्याला
सवाल करण्याची हिंमत
केली नाही हे
सोयीस्कर म्हणून विसरतो
पाच वर्षे त्यांच्यापुढे आपली
एकदाही जीभ रेटत नाही
एकदाही चढ्या आवाजात
सवाल करण्याची हिंमत होत नाही
किड्या-मुंग्यांप्रमाणे कुरतडत
लाजिरवाणं जगत राहतो
कुणीही यावं, थुंकून जावं
आपण ओठ मिटून राहतो
मतदार राजा आपण आहोत
याची मतदानाच्या दिवशीही
किंमत नाही
सेलिब्रिटी म्हणून आपला फोटो
पेपरात कधी येत नाही
भ्रष्ट डोक्यावर बसला, दोषी
संजू प्रचार करू लागला,
सनी काय, बनी काय आणि
तो सुजयही काय? कुणीही
यावं, कुणीही जावं, पक्ष सोडावा,
उमेदवारीसाठी लोटांगण घालावं,
काहीही सुरू आहे,
काहीही सुरू राहते
आपली त्यांना भीतीच नाही
कारण प्रश्न आपण विचारत नाही
आज लोकशाहीचा म्हणे
उत्सव साजरा झाला
बोटावरच्या शाईने म्हणे
हक्क बजावला
मतदार राजा झाला
मतदार राजा झाला
दिवसभर कौतुक झाले
आता बस्स करा सगळे
उद्यापासून खड्डे, पाणी, वीज,
दुष्काळ, आत्महत्या, उष्माघात
सगळे प्रश्न फक्त आपले
पाच वर्षे आपण त्यांची
लाळ घोटत राहणार
त्यांनी टाकलेल्या तुकड्यांवर
शेपूट हलवत जगत राहणार
रांगणारे किडे आपण
आज कणा तोडून आलो
जो निवडून येईल त्याचे
हुजरे बनायला तयार झालो
ही लोकशाही कसली?
अन् मतदारांची मर्दुमकी कसली?
खरा हक्क बजावायचा असेल
तर पुढची पाच वर्षे हिम्मत दाखवा
दर दिवशी जो त्रास होईल
त्याचा आमदार, खासदाराला
सवाल करा
आणि ते जमणार नसेल तर
त्यांच्या नोटा घेऊन गुमान पडून
राहा
ते पाच वर्षे उत्सव करतील
पुन्हा हात जोडून मतं मागतील
आपण रांगेत उभे राहू
मतदान करून गुडघ्यावर येऊ
पुन्हा शेपटी हलवत राहू
फेकतील ते तुकडे झेलत बसू!